



कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम

**प्रेरणास्थान**




**संपादन :** प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती :** प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य
उप प्राचार्य आनंद हुली
प्रा. एस. जे. आवटे
प्रा. दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ :** सचिन वि. क्षिरसागर (विराक्षी)

**सजावट-मांडणी :** प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक - प्रकाशक :** कल्पकला प्रिंटीग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.
संपर्क : ०२१७-२६००४८१/८२
ई-मेल :
pratibhasangam@sangameshwarcollege.in
वेबसाईट :
www.sangameshwarcollege.in

**मनोगत**

कर्मयोगी कै. आप्पासाहेब काडादी यांच्या दूरदृष्टीतून श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित संगमेश्वर कॉलेजच्या माध्यमातून १९५३ पासून ज्ञानदानाचे अखंड कार्य सुरू आहे. काळाच्या बदलत्या स्थित्यंतराबरोबर शिक्षणक्षेत्रातील नवोपक्रम कॉलेजच्या विविध उपक्रमातून सध्या सुरू आहेत. सोलापूरच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कॉलेजमधून अनेक दिग्गज मंडळींनी शिक्षण घेऊन आपलं कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यातून संगमेश्वरची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा निर्माण झाली. न्यायमूर्ती अजित शहा, न्यायमूर्ती भीमराव नाईक ,विधानसभेचे माजी सभापती प्राध्यापक ना. स. फरांदे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे माजी स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री -लक्ष्मणराव ढोबळे, राज्याचे महाधिवक्ता डव्होकेट आशुतोष कुंभकोणी, जिल्हाधिकारी स्वामीनाथ कलशेट्टी, आंतरराष्ट्रीय धावपटू वंदना शानभाग, अनघा देशपांडे या माजी विद्यार्थ्यांनी ही शैक्षणिक परंपरा निर्माण करून या शिक्षण संस्थेचा नावलौकिक वाढवला .

सद्यस्थितीत केजी टू पीजी पर्यंतचे शिक्षण एकाच छताखाली मिळावे यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. काळाची पावले ओळखून संगमेश्वर पब्लिक स्कूलची उभारणी झाली.आता सीबीएसई पॅटर्न मधून विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कै. मेघराज काडादी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून परीक्षेची तयारी विद्यार्थी करताहेत. कै. सरोजनी अण्णाराज काडादी कॉम्प्युटर सायन्सच्या माध्यमातून संगणक शिक्षण मिळते आहे. व्यवस्थापन शास्त्राचे तंत्र बदलत आहे त्यानुसार बीबीए चे स्वतंत्र विभाग सुरू आहे, ज्युनिअर कॉलेज च्या माध्यमातून कला, विज्ञान, वाणिज्य शाखेत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संपूर्ण शिक्षण संकुलात क्रीडा विभागातून अनेक विद्यार्थी राज्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले आहेत. ती परंपरा आजही पुढे सुरू आहे. क्रीडापटूंनी, वेगवेगळ्या विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी कॉलेजचे नाव उज्ज्वल केले आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

शाळा-कॉलेजमधील नाविन्यपूर्ण घडामोडींचा आढावा आपणाला समजावा, संस्थेच्या अनेक विविध गोष्टी आपल्यापर्यंत पोहोचवण्यात एक माध्यम असावे या हेतूने हे नियतकालिक आपल्या हाती देत आहोत. विद्यार्थी विकास आणि उत्तम संस्कारातून शिक्षण हे एकमेव धोरण घेऊन संस्था शिक्षण क्षेत्रातील बदल स्वीकारत आहे. श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थांच्या माध्यमातून घडणाऱ्या घडामोडी या आपल्या माजी विद्यार्थ्यांना, मान्यवर प्राध्यापकांना, हितचिंतक तसंच या उज्ज्वल शैक्षणिक प्रवासाचे सहप्रवासी होऊ इच्छिणाऱ्या सर्वांना कळावेत हा हेतू यामागे आहे. त्यातून शैक्षणिक क्षेत्रातील वैचारिक देवाण-घेवाण व्हावी हा प्रामाणिक उद्देश समोर आहे कौशल्य आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी आम्ही ही कटिबद्ध आहोत हा शैक्षणिक प्रवास कसा घडला सध्या तो कसा घडत आहे.याचं प्रतिबिंब या प्रतिभासंगमच्या माध्यमातून उमटेल असा विश्वास वाटतो. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीत संस्था करत असलेले असलेल्या कार्याची माहिती वाचकांपर्यंत पोहोचावी, त्यातून आपल्या प्रतिक्रिया समजाव्यात म्हणजेच सर्वसमावेशकता येऊन संस्थेची वाटचाल अधिक दिशादायी व्हावी तिला बळकटी मिळावी . आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया अवश्य कळवा आपल्या आपुलकीच्या सदिच्छांच्या बळावर संगमेश्वरचा हा प्रवास सुरू आहे,हे आम्ही जाणतो. निश्चितच वाचक या नियतकालिकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा.



**धर्मराज काडादी**
सचिव, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर






**स्पर्धा परीक्षेचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी नियोजन महत्त्वाचे - शिरीष धनवे यांचे प्रतिपादन**

**संगमेश्वर मध्ये अकरावी गुणवंतांचा कौतुक सोहळा संपन्न**

स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी प्रथमता मोठी स्वप्ने पहा ती सत्यात उतरण्यासाठी नियोजन आणि कठोर परिश्रम महत्त्वाचे आहे. भविष्याकडे आत्मविश्वासाने सजगतेने पहा असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिकेचे वित्त व लेखा अधिकारी शिरीष धनवे यांनी केलं ते संगमेश्वर कॉलेजच्या अकरावी गुणवंतांच्या कौतुक सोहळ्यात बोलत होते. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रा. प्रसाद कुंटे, समन्वयक प्रा. प्रमोद उडगीकर, प्रा.शिवराज पाटील,प्रा. प्रभाकर नागणसुरे ,प्रा.रंगसिद्ध पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थी पालकांशी संवाद साधताना ते पुढे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेची तयारी कोणत्याही क्षेत्रातील विद्यार्थी करू शकतो. सध्या या क्षेत्रात तीव्र स्पर्धा वाढली आहे. काही जमले नाही म्हणून स्पर्धा परीक्षेकडे वळतोय असाही काहीसा ट्रेन्ड सध्या पहावयास मिळतो. त्यामुळे नियोजनबद्ध अभ्यास, परिस्थितीनुसार आपल्या व्यक्तिमत्त्वात बदल झाले पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे स्पर्धा परीक्षेत अपयश ही यशाची पहिली पायरी आहे हे लक्षात ठेवा अपयश पचवून पुढे जाता येतं असं कित्येकांच्या यशस्वी मुलाखतीतून आपल्याला लक्षात आल आहे. पैसा हेच सर्वस्व नाही संस्कार महत्त्वाचे आहेत. व्यसनापासून दूर रहा. पाणी वाचा आणि वाचावा. छान ज्ञानवर्धक पुस्तके वाचा. भविष्याकडे आत्मविश्वासाने सजगतेने पहा. असाही मौलिक सल्ला त्यांनी दिला. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉक्टर शोभा राजमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. त्यानंतर ११वी कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि विषयातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे देखील पालकांसोबत सत्कार झाले.

●●●



**संगमेश्वरमध्ये बारावी नंतरचे करियर या विषयावर व्याख्यान**

संगमेश्वर कॉलेजच्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी माझं करिअर या उपक्रमांतर्गत १२वी नंतरचे करियर या विषयावर परवीन जमादार यांचा व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की 'जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःमधली बलस्थाने ओळखा, उणिवा शोधा आणि त्यावर उपाय शोधा. स्वतःमधील उणिवा दूर करून आपल्या बलस्थानांना अनुसरून करिअरच्या वाटा निवडल्या की आपण जीवनात नक्कीच यशस्वी होतो.

●●●



## महात्मा गांधीजींनी सामान्यांमध्ये असामान्यत्व निर्माण केलं

- डॉ. सोमनाथ रोडे

**'बा-बापू' सर्वोदय चे संगमेश्वर कॉलेजमध्ये व्याख्यान.**

महात्मा गांधीजींनी आपल्या उभ्या आयुष्यात भारतातील सामान्य जनतेला त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून देऊन त्यांच्यात असामान्य सामर्थ्य निर्माण केले असे प्रतिपादन सोमनाथ रोडे यांनी केले. महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सव समिती आयोजित 'बा- बापू' सर्वोदय व्याख्यानमालेत बोलत होते. अध्यक्षस्थानी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी होते तर मंचावर प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, माजी प्राचार्य नरेश बदनोरे, प्राणी मित्र विलास भाई शाह, सुभाष शास्त्री, सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक मंगलमुर्ती धोकटे, महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेजचे प्रा. उमाकांत चनशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापूर विद्यापीठ, महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज बोरामणी आणि प्राणी मित्र विलास शिवलाल शहा सर्वोदय ट्रस्ट यांच्या सहकार्याने व्याख्यान संगमेश्वर महाविद्यालयात हे व्याख्यान आयोजित केलं होतं. 'जागतिकीकरणात गांधीविचारांची उपयुक्तता' या विषयावरील व्याख्यानात बोलताना महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सोमनाथ रोडे यांनी गांधीजींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विचारांचा आढावा घेत जगाच्या इतिहासात गांधी विचारांचा प्रभाव कसा आहे याचे सविस्तर विवेचन करत मार्टिन ल्युथर किंग , नेल्सन मंडेला, मलाला युसुफजाई, रेमन मॅगेसेसे पुरस्कार विजेते मो. युनूस, सरहद्द गांधी, विल्सन चर्चिल यांच्या जीवनातील प्रेरकप्रसंग सांगत दिलखुलास संवाद साधला. गांधीजींनी ग्रामराज्य कसे होईल आणि त्यासाठी तरुणांनी कसा पुढाकार घेतला याचे अनेक प्रसंग आणि दाखले त्यांनी दिले. प्रारंभी गांधीजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले. प्राध्यापक उमाकांत चनशेट्टी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून व्याख्यानाचा हेतू स्पष्ट केला. प्राध्यापक डॉ. राजकुमार मोहोळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिल्यानंतर अरुण कुमार धुमाळ यांनी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन दिमडीच्या तालावर सादर केलं . याप्रसंगी रामचंद्र आलुरे ,उपप्राचार्य आनंद हुली, नाईट कॉलेजचे प्राचार्य संजय आवटे, वालचंदचे माजी प्राचार्य चंद्रकांत चव्हाण, साने गुरुजी कथामालेचे अशोक खानापुरे , संगमेश्वर कॉलेज मधील सर्व विभाग प्रमुख तसेच एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राध्यापिका सोनाली गिरी यांनी सूत्रसंचालन केले तर शिवानी ढवणे हिने आभार मानले.

●●●

## विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रकल्पातून संशोधनाकडे जावे - व्यंकटेश गंभीर

## संगमेश्वर कॉलेजमध्ये दोन दिवसीय विज्ञान प्रकल्प प्रदर्शन संपन्न

विद्यार्थ्यांनी शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात अनेकविध विज्ञान प्रकल्पातून संशोधनाकडे जावे असे प्रतिपादन सोलापूर विज्ञान केंद्राचे माजी समन्वयक व्यंकटेश गंभीर यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज च्या वतीने आयोजित केलेल्या दोन दिवसीय विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते संगमेश्वर कॉलेज च्या आवारातील संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या इमारतीत हे दोन दिवसीय प्रदर्शन भरले आहे. यामध्ये विविध महाविद्यालयातील १४५ प्रकल्पांचा समावेश आहे. याप्रसंगी सोलापूर



विज्ञान केंद्राचे राहुल दास , सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर शंकर नवले,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, कॉलेजच्या प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉक्टर शंकर नवले यांनी कृषी, विज्ञान आणि पारंपारिक ऊर्जा स्त्रोत यावर विद्यार्थ्यांनी बनवलेल्या प्रकल्पावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत दिलखुलास संवाद साधला. ते म्हणाले की विज्ञान प्रकल्पाच्या माध्यमातून आपली वैज्ञानिक दृष्टी विकसित होते. त्यामुळे पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात करण्यासाठी युवक तयार होतात . कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग सामान्यांना शेती धंद्यासाठी उपयोगी पडतात. या संशोधन प्रकल्पातून असे शेतकरीसंशोधक तयार होतील.

●●●



**मास्टर माईंड प्रश्नमंजुषा स्पर्धेत संगमेश्वर कॉलेज चे यश**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या बी. बी. ए. विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय मास्तर माईंड (बिझनेस क्विझ) प्रश्नमंजुषा स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या (वाणिज्य विभाग) २० संघांनी सहभाग नोंदवला. यापैकी २ संघ पुढील फेरीसाठी निवडले गेले. साक्षी कुलकर्णी, विजया गाटे या १२वी वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक मिळवला. रोख रक्कम एक हजार, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देऊन विजेत्या संघाचा बी. बी. ए. विभाग प्रमुख डॉ. पंकज डोळस यांनी सत्कार केला. याच कार्यक्रमात २० संघातील स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला .

या यशाबद्दल संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रा. आनंद हुली, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.पी. एस. नागणसुरे, प्रा. मल्लिनाथ साखरे, प्रा. आर.एम. पाटील प्रा. बी.आय. हणमगाव यांनी अभिनंदन केले.

●●●




**संगमेश्वर महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची बँक ऑफ इंडिया येथे क्षेत्रभेट**

संगमेश्वर महाविद्यालयातील इयत्ता अकरावी वाणिज्य शाखेतील द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या अंतर्गत बँकिंग व ऑफिस मॅनेजमेंट या विद्यार्थी या विषयाच्या अभ्यासक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट बँक ऑफ इंडिया शाखा रेल्वे लाइन्स सोलापूर येथे झाली. बँक ऑफ इंडिया शाखा रेल्वे लाईनच्या मॅनेजर ज्योती इरुवंती यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत करून बँकेच्या कामकाजाची माहिती दिली. चेक म्हणजे काय? तो कसा वाटला जातो? आरटीजीएस म्हणजे काय ? नेफ्ट , मनी ट्रान्सफर या बँकेच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली .

●●●

**यांत्रिकीकरणाच्या स्पर्धेत वाणिज्य शाखेतली आव्हाने ओळखा**

**आर्थिक सल्लागार मुरली अय्यंगार यांचे प्रतिपादन**

यांत्रिकीकरणाच्या स्पर्धेत वाणिज्य शाखेतली आव्हाने ओळखा आणि स्वत:मध्ये बदल स्वीकारण्याची क्षमता निर्माण करा असे प्रतिपादन आर्थिक सल्लागार मुरली अय्यंगार यांनी केले. ते संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालय वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित 'करिअर इन कॉस्ट अकाऊंटिंग' या विषयावर बोलत होते .अय्यंगार पुढे म्हणाले की, कालगती बरोबर यांत्रिकीकरण प्रचंड वाढत आहे .मनुष्याची जागा यंत्रमानव घेता आहे. याची सुरुवात पाश्चिमात्य झाली आहे. याचा वेग प्रचंड आहे. सोलापूर स्मार्ट सिटीच्या दृष्टिकोनातून विकसित होतं असताना महाविद्यालयीन स्तरावरील वाणिज्य शाखेत आपले भविष्य घडविताना आपल्याला सतर्कतेने, सचोटीने अभ्यास करावा लागणार आहे.

●●●

**संगमेश्वर कॉलेजमध्ये हिमोग्लोबिनची तपासणी रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांचा उपक्रम**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्यावतीने संगमेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या तपासणी शिबिराचे उद्घाटन डॉ. मंजुश्री कुलकर्णी यांनी केले. उद्घाटनानंतर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, विद्यार्थिनींनी बाहेरचे जंक फूड न खाता घरी बनवलेले ताजे व सकस अन्न घेणे आवश्यक आहे तसेच आहारात पालेभाज्या यांचा समावेश जरूर करावा यामुळे शरीर सुदृढ होईल.

●●●




# माध्यम क्षेत्रात युवकांना करिअरच्या वैविध्यपूर्ण संधी

- अंकुश चव्हाण

**संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने माझं करिअर उपक्रमाअंतर्गत व्याख्यान**

बदलत्या माध्यम क्षेत्रातील क्रांतीमुळे या क्षेत्रात युवकांना करिअरच्या अनेक वैविध्यपूर्ण संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा लाभ उठवण्यासाठी आपण माध्यमांकडे सजगतेने पाहणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन स्तरावर राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते या उपक्रमातून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कम्युनिटी रेडिओ, युट्युब चॅनेल, अनेक मराठी वाहिन्या, रियालिटी शोमध्ये काम करण्यासाठी ध्वनी सहायका पासून तंत्रज्ञा पर्यंत अनेक कौशल्यपूर्ण युवकांची गरज असते. कॅमेरामन पासून ते राज्याच्या माहिती कार्यालयापर्यंत, वर्तमानपत्रातील वार्ताहरा पासून ते मुख्य पानाच्या पेजीनेशच्या कुशल ऑपरेटर पर्यंत अशा विविध क्षेत्रात तुम्ही काम करू शकता. शिक्षणाचे माध्यम कोणतेही असो कठोर मेहनतीची जिद्द असावी लागते. भारतीय माहिती प्रसारण कार्यालयापासून, स्थानिक वृत्तवाहिन्या एफएम स्टेशन्स, आकाशवाणी, कम्युनिटी रेडिओ, जाहिरातींच्या प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक एजन्सी या वेगवेगळ्या क्षेत्रात युवकांना संधी उपलब्ध आहेत थोडसं कलेचं अंग असेल आणि बोलण्याची कला असल्यास युवक त्यात आपलं उज्वल करिअर करू शकतो असे प्रतिपादन अंकुश चव्हाण (क्षेत्रीय प्रचार अधिकारी भारत सरकार) यांनी केलं. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ महाविद्यालय आयोजित माझं करियर या उपक्रमांतर्गत 'माध्यम क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावरील व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी उपप्राचार्य आनंद हुली भाषा समन्वयक शिवराज पाटील, कला विभाग समन्वयक आर. एस. पाटील, एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषा समन्वयक शिवराज पाटील यांनी केले. प्रा. संतोष पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर कॉलेजच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. माध्यम क्षेत्रातील विविध घडामोडींचा आढावा घेत २००० नंतरच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातील झालेल्या बदलांचा आणि त्या स्थित्यंतराचा आढावा घेत अनेकविध संधी कशा पद्धतीने आपल्या जवळ येतात आणि त्याचं मार्केटिंग आणि ब्रँडिंग होताना कुशल तंत्रज्ञानाची कशी गरज आहे आणि त्याला कोणत्याही शिक्षणाच्या माध्यमाची गरज नसताना ज्या क्षेत्रामध्ये आपण जाऊ त्या क्षेत्रात करिअर करू शकतो. त्यासाठी फक्त आपल्या आवडीची गरज असते असा दिलखुलास संवाद अंकुश चव्हाण साधत होते. खुनेश्वर सारख्या ग्रामीण भागातून येऊन इंडियन इन्फॉर्मेशन सर्विस सारख्या क्षेत्रामध्ये काम करताना आलेल्या अनेकविध संधीचा आपण कसा फायदा घेतला आणि त्यातून लोककल्याण कस करता येईल हे पाहता आलं. अनेक सेलिब्रिटींबरोबर काम करत असताना व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होते . हे अगदी जवळून पाहता आलं मंत्रालय ते चित्रपट महामंडळ हा प्रवास त्यांनी उलगडून दाखवला.

याप्रसंगी प्राध्यापिका कोमल कोंडा, प्राध्यापिका रश्मी कन्नूरकर, प्रा. शहाजी माने प्रा. वामन वेताळ प्रा. शंकर कोमुलवार प्रा. शिवराज देसाई प्रा. प्रकाश कतनळी यांच्यासह कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते . प्राध्यापक दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी सूत्रसंचालन केले तर प्राध्यापक विश्वनाथ कक्कळमेली यांनी सर्वांचे आभार मानले.



# उद्योगात येण्यासाठी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाची कास धरावी - राजू राठी

## बिझनेस क्विझ स्पर्धेत संगमेश्वरचे सलाउद्दीन नायकवडी, मानस शहा अव्वल

काळाची आव्हाने ओळखून वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाची कास धरावी असे प्रतिपादन सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष यांनी केलं. ते संगमेश्वर जुनियर कॉलेज वाणिज्य विभागाने आयोजित केलेल्या बिझनेस क्विझ या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात बोलत होते. उपप्राचार्य आनंद हुली, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, वाणिज्य विभागप्रमुख प्रभाकर नागणसुरे आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की उद्योगात येताना कायदा आणि व्यवहारी दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. मोठी महत्त्वाकांक्षा सत्यात उतरवायची असेल तर काळ काम आणि वेग यांचा विचार केला पाहिजे. इन्स्टंट जमान्यात वेळेत आपली कामं ग्राहकांना पुरवली की आपणच आपलं ब्रँड निर्माण करतो. येणाऱ्या काळात जॉब करण्यापेक्षा देणारे जॉब देणारे होण्यासाठी डोळसपणे उद्यमशीलतेकडे पहिले पाहिजे. उद्योगातील बारकावे, वित्तीय संस्था यांची धोरणे, इतर उद्योगी माणसांचे अनुभव, केंद्रीय अर्थसंकल्प या बाबी नीट जाणून घ्या. विदयार्थी दशेत नवं नवीन कौशल्ये शिका. बहुभाषिक कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास होतो, असे सांगत राजू राठी यांनी मार्गदर्शन केले

प्रारंभी मल्लिनाथ साखरे यांनी प्रास्ताविक केले, रुपाली पाटील यांनी परिचय करून दिला. त्यानंतर कॉलेजच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. सत्कारानंतर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. बिझनेस क्विझसाठी सहकार्य केलेल्या मार्गदर्शकांचा सन्मान याच कार्यक्रमात करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या सलाउद्दीन नायकवडी, मानस शहा- प्रथम (संगमेश्वर कॉलेज) नवीन दुडम, प्रतीक चेळेकर- द्वितीय (डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज) छाया भाटिया, प्रीती अंत्रोळीकर- तृतीय (हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स यासना भाटिया ,धनश्री माड्याळ - उत्तेजनार्थ प्रथम (एम. आय. टी. कॉलेज) सुशांत बनसोडे, श्रीपाल जाधव- उत्तेजनार्थ द्वितीय (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज) या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील २१ महाविद्यालयातील २८२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.






●●●



**संगमेश्वर कॉलेजमधील ज्युनिअर विभागतील प्राध्यापिका रूपाली पाटील यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पीएचडी**

कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विभागात स्टडी ऑफ ट्रेंड्स अँड अपोर्च्युनीटीज ऑफ मेडिकल टुरिझम इन वेस्टर्न महाराष्ट्र २००९ -२०१४ हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता त्यांना मॉडन कॉलेज पुण्याचे प्रा. डॉ. एस. सी. शिरगावे यांचे मार्गदर्शन लाभले. संगमेश्वर मधील वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातील प्राध्यापकांनी त्यांना सहकार्य केले. ●●●



**संगमेश्वर कॉलेजमधील ज्युनिअर विभागतील प्राध्यापक विठ्ठल आरबाळे यांना अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची पीएचडी**

जिऑग्राफिकल अॅनॅलॅसिस ऑफ टुरिझम डेव्हलोपमेंट इन ड्रॉउट प्रोन रिजन ऑफ महाराष्ट्र अँड कर्नाटक हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता त्यांना खेडगी कॉलेज अक्कलकोटचे प्रा. डॉ. एस. सी. अडवितोटे यांचे मार्गदर्शन लाभले. संगमेश्वर मधील वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातील प्राध्यापकांनी त्यांना सहकार्य केले.

हार्दिक अभिनंदन ●●●



## महाविद्यालयीन तरुणींनो सोशल मीडियाच्या आमिषाला बळी पडू नका - नरसिंग अंकुशकर

### संगमेश्वर कॉलेजमध्ये शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने महिला जनजागृती कार्यक्रम

विद्यार्थिनीनो महाविद्यालयीन जीवनात कोणत्याही इंटरनेटवरील सोशल मीडियावरून येणाऱ्या फसव्या आमिषाला बळी पडू नका. असे आवाहन सदर बझार पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नरसिंग अंकुशकर यांनी केलं ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ महाविद्याल महिला सक्षमीकरण मंचच्या वतीने आयोजित केलेल्या 'स्त्री अत्याचार जनजागृती आणि महिलांविषयीचे कायदे' याविषयी आयोजित केलेल्या महिला जनजागृती कार्यक्रमात बोलत होते. मंचावर पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माशाळ,भाषा संकुलाचे समन्वयक प्रा. शिवराज पाटील, प्रा. बसय्या हणमगाव, महिला जनजागृती समितीच्या प्रा. शिल्पा लब्बा उपस्थित होते.

अंकुशकर यांनी विविध घटनाचा आढावा घेत या कार्यक्रमात पोलीस आणि समाज यातील दुवा निर्माण होताना महिला सक्षम करण्यासाठी आपली पोलीस प्रशासन म्हणून भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मासाळ यांनी राज्यभरातील गुन्ह्यातील घटनांचा व गुन्ह्यांचा मागोवा घेत चित्रफितीच्या माध्यमातून प्रबोधन केले.

●●●

## लोकमंगलच्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत संगमेश्वरची निशा कवडे प्रथम

लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील इयत्ता अकरावी वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी निशा गुंडोपंत कवडे हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तिने 'खरंच देशात बदल घडतोय?' या विषयावर आपले विचार मांडले. जिल्हाभरातून विविध महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या यशाबद्दल उपप्राचार्य प्रा. आनंद हुली, भाषा व संस्कृती मंडळाचे समन्वयक प्रा. शिवराज पाटील वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. प्रभाकर नागणसुरे, आणि प्राध्यापक वर्गांनी तिचे अभिनंदन केले.

●●●

## एनसीसी राज्यस्तरीय वार्षिक शिबिरात संगमेश्वरच्या कॅडेटस्‌चे यश

पुणे येथे झालेल्या यांच्या राज्यस्तरीय वार्षिक प्रशिक्षण शिबिरात संगमेश्वर कॉलेज च्या ९ महाराष्ट्र बटालियन कॅडेटच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. या प्रशिक्षणासाठी ५८ विद्यार्थ्यांची यापैकी ४८ विद्यार्थ्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदकाने गौरवण्यात आलंय. संपूर्ण कॉलेजचा संघ फिरत्या चषकाचा मानकरी ठरला.

●●●

## हार्दिक अभिनंदन



प्रजासत्ताक दिनी संगमेश्वर कॉलेजच्या नऊ बटालियन महाराष्ट्र या विभागातील संकेत मचाले आणि सज्जन इंगळे या दोन कॅडेट्सची २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी झालेल्या आरडी परेड साठी राष्ट्रीय ध्वज संचलनासाठी निवड झाली होती. सोलापुरातून एकाच महाविद्यालयातील दोन कॅडेटसची प्रथमच निवड झाली. या निमित्ताने संगमेश्वर कॉलेजच्या वतीने संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या यशस्वीताना मेजर चंद्रकांत हिरतोट, लेफ्टनंट शिल्पा लब्बा, कर्नल प्रमोदकुमार रावत, लेफ्टनंट कर्नल विकास पवार, सुभेदार मेजर जीतबहादूर गुरुंग,सुभेदार गजानन गुरव, सुभेदार रवींद्र पाटील, बी एस एम - बाबू शिंदे, हवालदार एफ एस पाटील, यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. शोभा शोभा राजमान्य उपप्राचार्य आनंद हुली, डॉ. राजशेखर येळीकर आदींनी अभिनंदन केले. याप्रसंगी पालक किरण मचाले,लोकप्पा इंगळे व बटालियन मधील सर्व एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

●●●

# संगमेश्वर मध्ये बँकिंग प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वितरण



वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच वाणिज्य शाखेतील कार्यपद्धतीचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी यांनी केलं. ते संगमेश्वर महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या द्विलक्षी अभ्यासक्रमांतर्गत बँकिंग प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या बँकिंग प्रशिक्षणासाठी सहकार्य करणाऱ्या सोलापूर जनता सहकारी बँकेचे चेअरमन प्राचार्य **गजानन धरणे** हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित होते. धरणे यांनी आपल्या भाषणात आजचे विद्यार्थी उद्याचे भारताचे भाग्यविधाते आहेत, होतकरू, करिअर ओरिएंटेड विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील व्यवहारिक ज्ञान देणे गरजेचे आहे आणि हे काम संगमेश्वर महाविद्यालय आणि सोलापूर जनता सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे.याचा लाभ युवकांनी घ्यावा. असे आवाहन केले.

# कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंती निमित्त चित्रप्रदर्शनाचे आयोजन



कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त चित्रप्रदर्शन आयोजित केले होते. प्रसिद्ध चित्रकार जॉर्ज ग्रेग जोसेफ झेबुकविक यांच्या लघु चित्रपटाचे सादरीकरण झाले. बार्शी येथील प्रख्यात चित्रकार सचिन बुरांडे यांचे व्यक्तिचित्रणाचे पोट्रेट प्रात्यक्षिक कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयात झाले. व्यक्तिचित्रणातील बारकावे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले .चित्रकार सचिन बुरांडे यांनी प्रारंभी कर्मयोगी अप्पासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. त्यानंतर कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रा. सचिन गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर धनंजय टाकळीकर यांनी परिचय करून दिला. प्रभारी प्राचार्य दीपक पाटील यांनी प्रास्ताविक केले तर रेखा पटणे यांनी सर्वांचे आभार मानले.

# प्राचीन वास्तूंच्या बांधणीचे तंत्रज्ञान समजावून घ्या - डॉ. मृणालिनी फडणवीस




**जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने संगमेश्वर कॉलेज पर्यटन विभागाचा उपक्रम**

'भारतातल्या प्राचीन वास्तूंच्या बांधणीचे तंत्रज्ञान समजावून घेऊन आपण त्या परंपरा जपल्या तर येणाऱ्या काळामध्ये पर्यटनाला चालना मिळेल. प्राचीन वास्तूंचे जतन आणि संवर्धन होण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे' असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर मृणालिनी फडणवीस यांनी केलं. जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने संगमेश्वर कॉलेज पर्यटन विभाग आयोजित भुईकोट किल्ला दर्शन या दोन दिवसीय कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते अध्यक्षस्थानी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी हे होते.

यांप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या की 'संगमेश्वर महाविद्यालय, पर्यटन विभागाच्या वतीने भुईकोट किल्ला विद्यार्थ्यांना पाहता यावा यासाठी पुरातत्त्व खात्याच्या सहकार्याने हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण व्हावी वास्तुशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र यासह बांधणी तंत्रज्ञान त्यांना समजावे यासाठी शिक्षकांनी आणि पर्यटन विभागातल्या विद्यार्थ्यांनी मदत करावी. सोलापूरचा भुईकोट किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित व्हावा यासाठी पुरातत्व खात्याने देखील ज्या जाचक अटी आहेत. त्या शिथिल करून किल्ल्याच्या विकासासाठी मदत करावी. पर्यटनाच्या माध्यमातून परकीय अभ्यासक, संशोधक आपल्या देशाला भेटी देत असतात या भेटीतून आपल्या देशाची सांस्कृतिक प्रतिष्ठा प्रतिबिंबित होत असते. ती जपण्याचा प्रयत्न आपण सारे जणच करूयात आणि पर्यटन शास्त्रातील वेगवेगळी आधुनिक तंत्र आपण आत्मसात करून त्यातून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विद्यापीठ कॉलेजच्या पर्यटन विभागाच्या वतीने प्रयत्न व्हावेत.' असे आवाहनही केले.

●●●

# संगमेश्वरमध्ये संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचा मुक्त संवाद

कश्मिरियत आणि हिंदुस्थानियत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, भारतात विविध जाती, धर्म, रूढी, परंपरा असल्या तरी या सर्वांमध्ये एकात्मता आहे . काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. परंतु काश्मिरियत संपुष्टात येऊ लागली तर ती चिंतेची बाब आहे.असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज च्या मराठी विभाग आणि ग्रंथालयाच्या वतीने आयोजित केलेल्या मुक्त संवाद कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य होत्या.




याप्रसंगी विद्यार्थ्यांनी साहित्य, राजकारण आणि प्रशासनविषयक विविध प्रश्नांच्या अनुषंगाने लक्ष्मीकांत देशमुख यांच्याशी संवाद साधला. वाचन, लेखन कसं करावं? या प्रश्नांना उत्तर देत महाविद्यालयीन जीवनातील वाचनप्रवासाचे महत्त्व त्यांना स्पष्ट केले. दिलखुलास संवाद साधताना वाचन संस्कृतीविषयी ते म्हणाले, सातत्याने विविध विषयावरील वाचन करीत राहिल्यास आपलं व्यक्तिमत्त्व समृद्ध होत राहील आणि कामातील सातत्याने आपल्याला यशाकडे जाता येईल. असेही देशमुख यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

## संगमेश्वरमध्ये मराठी विकिपीडिया कार्यशाळा उत्साहात संपन्न

संगमेश्वर कॉलेज मराठी विभाग आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विकिपीडिया राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजच्या ग्रंथालय विभागात झालेल्या कार्यशाळेत सुरेश खोले आणि रोहित वाळिंबे या तज्ञ मार्गदर्शक यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य समन्वयक प्रा. डॉ. सुहास पुजारी, डॉ. सारीपुत्र तुपेरे मंचावर उपस्थित होते. प्रा.डॉ. सुहास पुजारी, यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यशाळे मागचा हेतू स्पष्ट केला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला. या कार्यशाळेत विद्यार्थी प्राध्यापक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. विकिपीडियावरील माहिती कशा प्रकारे अद्ययावत करता येते. त्यासाठी लागणारे इंटरनेटवरील संदर्भ या बाबी स्पष्ट करून सुरेश खोले यांनी सांगितले. त्यानी वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजनात्मक प्रबोधन केले .त्यानंतर राज्य मराठी विकास संस्था यांच्या वतीने प्रशिक्षकांना प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्राध्यापक प्रा. मंगलमूर्ती डॉ.महादेव देशमुख, डॉ. दादासाहेब खांडेकर, प्रा. एस बी निंबर्गी दत्तात्रय गुड्डेवाडी,डॉ. राजकुमार मोहोरकर, प्रा. संगशेट्टी, प्रा. श्रीनिवास भंडारी ग्रंथपाल डी. एस. मुलीमनी, संतोष कुलकर्णी यांच्यासह संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते.







मुख्य श्री सिद्धेश्वर मंदिर

## धार्मिक पर्यटनासाठी संगमेश्वरच्या पर्यटनशास्त्र विभागाचा अभ्यास अभ्यासदौरा

सोलापुरातील सिद्धरामेश्वरांनी स्थापलेले प्राचीन ६८ लिंग हे सोलापूरच्या ऐतिहासिक वैभवात भर घालत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य शोभा राजमान्य यांनी केलं. सोलापूरचा प्राचीन ऐतिहासिक वारसा, त्यां वास्तूचं जतन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे त्यासाठी युवकांनी पुढाकार घेऊन पर्यटन शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरू केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य त्यांनी सांगितले ते संगमेश्वर महाविद्यालयाच्या पर्यटनशास्त्र विभागाच्यावतीने सोलापुरातील सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंग अभ्यास दौरा कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. प्राचार्य डॉ. राजमान्य म्हणाल्या की पर्यटनातून आपली संस्कृती जोपासली जाते आणि आपण जगाच्या नकाशावर आपली संस्कृती नेऊ शकतो. सोलापूरचा हा सांस्कृतिक ठेवा अश्या वैविध्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून जपला तर निश्चितच येणारा काळ हा धार्मिक पर्यटनासाठी अनुकूल असेल. सर्व ६८ लिंगांची माहिती आणि त्यांचा प्राचीन इतिहास प्रा.सोनाली गिरी यांनी सांगितला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सोलापूरशी निगडीत धार्मिक पर्यटनाची माहिती मिळाली.


## पालकांची 'नीट' आणि 'जेईई' ची तयारी. : NEET IIT JEE

१० ची परीक्षा दिलेल्या प्रत्येक पालकांना पडलेले अनेक प्रश्न? दहावी बोर्ड चा निकाल लागला की पुढे काय? कोणती शाखा निवडायची?

विज्ञान शाखा निवडली तर मग विविध स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करणार? त्यात अधिक गोंधळात टाकणाऱ्या असंख्य कॉलेज आणि कलासेस च्या जाहिराती. काय निर्णय घेणार? यात बऱ्याचवेळा ज्या विद्यार्थ्याला यास सामोरे जायचे आहे तो मात्र तटस्थ वा दुर्लक्षित. कशी करावयाची तयारी नीट आणि जेईई ची? खरे तर यासाठी अगोदर पालकाची नीटआणि जे ई ई तयारी आवश्यक आहे.

### काय आहे नीट आणि जेईई परीक्षा ?

वैद्यकीय विद्याशाखेच्या (मेडिकल) (एमबीबीएस व बी डी एस) प्रवेशासाठी नीट (NEET) परीक्षा, ही प्रवेश परीक्षा राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. या साठी बायोलॉजी ग्रुप निवडावा लागतो. तर अभियांत्रिकी विद्याशाखेच्या (इंजिनियरिंग) प्रवेशासाठी तथा भारतातील नामांकित आय आय टी कॉलेज मध्ये प्रवेश घेण्यासाठी आणि महाराष्ट्रातील काही नामांकित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी गरजेची असणारी राष्ट्रीय पातळीवर असणारी परीक्षा म्हणजे आय आय टी- जे ई ई प्रवेश परीक्षा. या सोबतच महाराष्ट्र शासन राज्य स्तरावर दोन्ही अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य स्तरीय प्रवेश परीक्षा (MH-CET) घेते. कालानुरूप परीक्षा पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत गेले परंतु आपण मात्र या पासून अनभिज्ञ. खरेतर याची काळजी ३ ते ४ वर्ष अगोदर पासून घेणे गरजेचे ठरते कारण परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करावी लागते.






**पूर्वतयारी** : यापरीक्षांच्या तयारीसाठी खरेतर इयत्ता ८ वी पासूनच सुरुवात केली पाहिजे. म्हणजेच पूर्वतयारी साठी किमान ३ वर्ष (इयत्ता ८,९,१०) आणि मुख्य तयारीसाठी ११वी व १२वी. केवळ २ वर्षातच तयारी करावयाची असेल तर विद्यार्थ्यांना खुपच परिश्रम घ्यावे लागतात.

**विद्यार्थ्याची इच्छा/आवड** : या सर्व प्रक्रियेमध्ये स्वयंप्रेरीत विद्यार्थी असणे गरजेचे असते.अथवा केवळ पालकांनी लादलेल्या अपेक्षेच्या ओझ्याखाली विदयार्थी दबून जातो. यासोबतच आणखी एक चिंतेची बाब म्हणजे दहावीच्या गुणांचा फुगवटा. या गुणांमधून विद्यार्थी आणि पालक बाहेरच येत नाहीत.

**पालकांचे ज्ञान/अज्ञान** : पालकांना अचानकच ११ वी मध्ये पाल्याने प्रवेश घेतला की मुलगा डॉक्टर किंवा इंजिनियर झाल्याचे स्वप्न पडू लागते. पण याची पूर्वतयारी ५ वर्षांपूर्वी करावी लागते याची पुसटशी कल्पनाही पालकांना नसते. यालाही काही अपवाद असतातच. सर्वच विद्यार्थी व पालक एक विशिष्ठ विद्या शाखेला प्रवेश घेत आहेत, मग मी पण माझ्या पाल्याचा प्रवेश याच शाखेला घेणार. परंतु त्या शाखेची पूर्ण माहिती, उपलब्ध असणाऱ्या संधी आणि माझ्या पाल्याची इच्छा यांचा एकत्रित विचार करणे या ठिकाणी गरजेचे ठरते. अन्यथा केवळ प्रवाहसोबत गेल्यामुळे भविष्यात संकटांना सामोरे जावे लागते. **अभ्यासक्रम भेदभाव** : या दोन्ही प्रवेश परीक्षा राष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणार असल्या कारणाने (NCERT) एन. सी.ई. आर.टी.अभ्यासक्रम अभ्यासने गरजेचे असते. परंतु आपण प्रवेश घेतो राज्य स्तरावरील (क्डउ) अभ्यासक्रमासाठी आणि तयारी

**प्रा.डॉ. गणेश अ. मुडेगावकर**
**संगमेश्वर कॉलेज, सोलापूर संपर्क: ९३७०४४०९४०**

●●●







## पत्रकारिता व जनसंवाद क्षेत्रातीलकरियर संधी

आज प्रत्येकाच्या हातात हाय स्पीड डाटानी सज्ज असलेलास्मार्ट फोन आहेआणि सोशल मिडीयावरच्या अफाट विश्वातप्रवेश करण्याचीसंधी उपलब्ध झालीआहे. त्यासाठी फार काही नियम किंवा त्रुटी नाहीत. त्यामुळे नवख्या आणि शिकाऊ लोकांचे सोशलमीडिया किंवा इतर माध्यमांमध्येआशय (Content) तयार करण्याचे आणि तो प्रसारित करण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. युट्युब सारख्या माध्यमांवर न्यूज चॅनल्सचा सुळसुळाट झाला आहे. अशा परिस्थितीत खरा पत्रकार आणि नवखा किंवा पत्रकार यातील दरी नष्ट होताना दिसते आहे. प्रत्येकच जण जरी स्वतःला पत्रकार किंवा सिटीझन जर्नालिस्ट म्हणवून घेत असला तरी या इंटरनेट आणि नवमाध्यमांच्याजंजाळातज्या तरुणांकडे या विषयाचे योग्य शिक्षण आणि पदवी आहे त्यांचा या माध्यमांकडे बघण्याचा उचित दृष्टिकोनआणि समाजाच्यानीतिमूल्यांनाधक्का न लागू देता त्यांचातत्वनिष्ठ वापर करून घेण्याची कला निश्चितचपणे गवसली आहे. माध्यमांच्या (Media) प्रकृतीची आणि त्यावरून प्रसारित करता येण्यासारख्या आशयाची योग्यसांगड घातली तर तरुणांना या क्षेत्रात प्रचंड मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. परंतु ही कला किंवा चातुर्य केवळ पत्रकारितेच्या योग्य शिक्षणानेच प्राप्त होऊ शकते.

पत्रकारिता व जनसंवाद (Journalism and Mass Communication) या क्षेत्रातकेवळ न्यू मीडिया हेएकच क्षेत्र नसून या अभ्यासक्रमात इतर अनेक गोष्टी शिकवल्या जातात. मुद्रित (वृत्तपत्रे व नियतकालिके) आणि दृक-श्राव्य (रेडिओ आणि दूरचित्रवाणी) माध्यमे, जाहिरात (Advertising), जनसंपर्क (Public Relations), चित्रपट व डॉक्युमेंट्री, वेब पत्रकारिता, डेव्हलोपमेंट कम्युनिकेशन यासारख्या क्षेत्रांमध्ये आजरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. या क्षेत्रात जाणकार व सर्जनशील तरुण-तरुणीची गरज आहे. पत्रकारितेचा अभ्यास केला असता केवळ बातमी आणि बातमी संबंधित लिखाणाचा अंतर्भाव होतो परंतु, जनसंवाद (Mass Communication) म्हणजे केवळ बातमीचे लिखाण नसून माध्यमांमध्ये संवाद कसा साधावा आणि प्रभावीलिखाण कसे करावे याचे शिक्षण मिळते.






हा कोर्स केलेली व्यक्ती पत्रकार सुद्धा होऊ शकते किंवा एखाद्या जनसंपर्क कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून सुद्धा काम करू शकते किंवा चित्रपट क्षेत्रात सुद्धा प्रवेश करू शकते.विद्यार्थांनी पत्रकारिता आणि जनसंवाद यातील फरक समजून घेणे येथे आवश्यक आहे. सर्वत्र जगात प्रिंट मीडिया (वृत्तपत्रे) लोप पावत असला तरी भारतात हे क्षेत्र अधिकच भरभराटीला येत आहे आणि आपल्यासाठी हि सकारात्मक बाब आहे. स्थानिक पातळीवर या क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या कमी आहे आणि जे करत आहेत त्यांच्याकडे अधिप्रमाणित पदवी नाही व अपेक्षित ज्ञानाची कमकरता आहे. अशा प्रसंगी तरुणांनी हे शिक्षण अवगत केले तर त्यांना आकाश तोकडे आहे.

आपल्या संगमेश्वर महाविद्यालयात पत्रकारिता व जनसंवाद (BJMC) हा अभ्यासक्रम गेल्या दोन वर्षांपासून सुरु आहे. हा एक वर्षाचा कोर्स असून वर उल्लेख केल्या प्रमाणे या कोर्समध्ये वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण दिले जाते तसेच प्रात्यक्षिकांवर अधिक भर दिला जातो कारण माध्यमांमध्ये तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे आणि त्याचा वापर करता येणे आज गरजेचे झाले आहे.

हा कोर्स करून विद्यार्थी पत्रकार (Reporter), TV Anchor, रेडिओ निवेदक, उपसंपादक, व्हिडीओ एडिटर, कन्टेन्ट निर्माते व लेखक, फिल्ममेकर, डॉक्युमेंटरी मेकर, फोटोग्राफर, वेब जर्नालिस्ट, सोशल मीडिया अनॅलिस्ट, जाहिरातदार, जनसंपर्क अधिकारी, रेडिओ जॉकी, साऊंड रेकॉर्डर इ. म्हणून काम करू शकतात. तसेच या क्षेत्रात विविध वृत्तपत्रे, खाजगी एफएम वाहिन्या, जाहिरात संस्था, वृत्तपत्रे व नियतकालिके, टीव्ही न्यूज चॅनल्स, न्यूज एजन्सी, वेबसाईट्स, डिजिटल मार्केटिंग एजन्सीमध्ये रोजगाराच्या अमाप संधी उपलब्ध आहेत. याशिवाय स्वयंरोजगाराच्या संधी पण उपलब्ध आहेत हे या अभ्यासक्रमाचे वैशिट्य म्हणावे लागेल. अनेक लोकांनी या क्षेत्रात आपला व्यवसाय सुरु केला असून आज तो भरभराटीला आला आहे.

इंजिनीअरिंग किंवा आयटी क्षेत्रासारखे हे क्षेत्र एकांगी व यांत्रिकी नसून येथे सर्जनशीलतेला (Creative) वाव आहे आणि यातील नोकरी ही कंटाळवाणी व निरसवाणी नसून नाविन्यपूर्ण व मजेशीर आहे. यातूननवनवीन लोकांना भेटण्याची संधी






आणि वेगवेगळ्या विषयांची होणारी ओळख माणसाला परिपक्व करते व आयुष्याला निश्चितपणे उभारी देते.

**चैतन्य शिनखेडे**

(लेखक टिळक महाराष्ट्र विद्यापीठात जनसंवादात पीएचडी करीतआहेत व माध्यमांचे अभ्यासक आहेत)





डॉ. रेड्डी शेखर रेड्डी



मा. शितल काडादी



डॉ. ॲनी जॉन

## इंग्रजीची व्याप्ती लक्षात घेऊन ज्ञानदान करावे - डॉ. रेड्डी शेखर रेड्डी

**संगमेश्वर कॉलेजमध्ये इंग्लिश लँग्वेज टीचर्स असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे उद्घाटन**

इंग्रजीची जागतिक स्तरावरील व्याप्ती लक्षात घेऊन ज्ञानदान करावे. त्यातून भारताची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा निर्माण करण्याचे कार्य शिक्षकचं करू शकतात असे प्रतिपादन डॉक्टर रेड्डी शेखर रेड्डी यांनी केलं.देशपातळीवरील इंग्रजी विषय शिक्षक संघाच्या सोलापूर शाखेचे उद्घाटन राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉक्टर रेड्डी यांच्या हस्ते झाले याप्रसंगी ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून शितल काडादी उपस्थित होत्या. सोलापूर शाखेच्या अध्यक्ष डॉ. ॲनी जॉन, उपाध्यक्ष डॉ. मनोहर जोशी, सचिव डी. एम. मेत्री आदी मान्यवर उपस्थित होते. डॉक्टर रेड्डी पुढे म्हणाले की, ''बदलत्या काळानुसार इंग्रजी अध्ययन-अध्यापनात आमूलाग्र बदल होत आहेत. त्या बदलांचा स्वीकार करून ही जागतिक भाषा भारतवर्षामध्ये सहजसोपी करण्यासाठी ही देशपातळीवरील इंग्लिश टीचर असोसिएशन ऑफ इंडिया संस्था कार्यरत आहे. त्या संस्थेच्या माध्यमातून सध्या ४१ शाखेतील शिक्षकांच्या माध्यमातून काम सुरू आहे. देशपातळीवरील कृतिशील ५००० शिक्षक या संघाचे सभासद आहेत. त्यांच्या माध्यमातून परिसंवाद, विषय कार्यशाळा, समुपदेशन, प्रकल्प सादरीकरण अशा विविध शैक्षणिक कामाचे नियोजन करून इंग्रजी विषयाच्या संवर्धन आणि संगोपन सुरु आहे.१९७४ पासून सुरु झालेल्या या अभियानात सोलापूरकर उत्तम प्रतिसाद देत आहेत याचा मनस्वी आनंद आहे.''

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन झालं. त्यानंतर मनोहर जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डी.एम. मेत्री यांनी संघाचा हेतू स्पष्ट केला. पाहुण्यांचा परिचय रेवणसिद्ध हालोळी यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना शितल काडादी म्हणाल्या की, ''इंग्रजी विषयाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या संघाचा उपयोग शिक्षकांच्या जीवनामध्ये नेहमीच होत असतो. इंग्रजी विषयासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचं काम संगमेश्वर कॉलेजच्या माध्यमातून होत आहे. या संधीचा अवश्य लाभ घ्यावा.अशा उपक्रमांना संस्था नेहमी प्रोत्साहन देते आणि यापुढेही असेच सहकार्य लाभेल.'' आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. जॉन यांनी ''या उपक्रमात जास्तीत जास्त शिक्षकांनी सहभाग नोंदवून देशपातळीवरील या शिक्षक संघाच्या माध्यमातून ज्ञानदानाबरोबरच राष्ट्रघडणीचे कार्य करावे''असे मत मांडले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील शाळा - महाविद्यालयातील इंग्रजी विषय शिक्षकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोमल कोंडा यांनी केले तर आभार शहाजी ठोंबरे यांनी मानले.

●●●



## जेईई मेन्स परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे

## घवघवीत यश

राष्ट्रीय परीक्षा परिषद, दिल्ली यांच्या वतीने जानेवारी व एप्रिल २०१९ मध्ये घेतलेल्या ऑनलाइन जेईई मेन्स २०१९ परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.यामध्ये १८ विद्यार्थी विविध प्रवर्गातून यशस्वी झाले.

पर्सेंटाइल पद्धतीने यशस्वी विद्यार्थी- विश्वनाथ पवार (९९. २९ ),अथर्व गोखले (९९.२ ), स्वामीनाथ नालवार (९८.८५),मुद्दय्या स्वामी(९७.७) , श्रेया कोळकूर (९६.३२) ओमकार गवळी (९५.९४) ,रिद्धी थरेवाल (९५ .८५ ) , तेजस्विनी करपे ( ९४.८६ ) प्रज्वल दराडे ( ९४.१७ ) ,अनुप जुजगार ( ९४.१७) हर्ष कापसे (९२.८ ), ओंकार साळे ( ९१.९७ ) , साहिल बागवान ( ८९.९६) , परितोष रुपनर (८५) , आलोक बन्दीछोडे ( ८५ ), प्रगती बिराजदार (७९.९५ ) ऋषिकेश कारंडे ( ७८.४ ). भारतातील राष्ट्रीय पातळीवरील आय आय टी अभियांत्रिकी संस्थेत प्रवेशास पात्र होण्यासाठी एनटीए या संस्थेच्या मार्फत जेईई-मेन ही परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेस अकरा लाख ४७ हजार १२५ विद्यार्थी बसले होते.त्यापैकी २ लाख ४५ हजार विदयार्थी जेईई ऍडव्हान्स साठी पात्र ठरले आहेत.

या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना प्राध्यापक संतोष गवळी यांनी संगमेश्वर महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे ऋण व्यक्त केले . याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी , संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, लॉजिक इन्स्टिट्यूटचे प्रा. सुशांत माळगे, प्रा. शिवराज बगले प्रा.अविनाश घोडके, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, समन्वय डॉ. गणेश




मुडेगावकर विज्ञान शाखा समन्वक प्रा. प्रमोद उडगीकर, प्रा. सिद्धाराम विजापुरे, प्रा. अभिजित निवर्गीकर यांनी अभिनंदन केले.

याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना प्राध्यापक संतोष गवळी यांनी संगमेश्वर महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे ऋण व्यक्त केले . याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

# संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील दहा खेळाडूंची विविध खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी व महाराष्ट्र संघामध्ये निवड

संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील दहा खेळाडूंची विविध खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघामध्ये निवड या उज्ज्वल कामगिरी बद्दल संस्थेचे सचिव धर्मराज काडादी यांच्या हस्ते सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. **निहाल गिराम** बारावी वाणिज्य शाखेत शिकत असून नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण डायव्हिंग स्पर्धेतून दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात त्याची निवड झाली आहे.

**ज्योत्सना मदने** व **कांचन चौगुले** या दोघी बारावी शास्त्र शाखेत शिकत असून मुंबईत झालेल्या सॉफ्टटेनिस राज्यस्तरीय स्पर्धेतून देवास मध्य प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात त्यांची निवड झाली आहे. **प्रियांका रावत** बारावी शास्त्र शाखेत शिकत असून चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतून बडोदा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**मानसी जाधव** अकरावी शास्त्र शाखेत शिकत असून नागपूर येथे झालेल्या सॉफ्टबॉल राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेतून नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**कल्याणी चव्हाण** अकरावी वाणिज्य शाखेत शिकत असून अहमदनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेतून आंध्रप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**प्रतीक चितारे** अकरावी कला शाखेत शिकत असून मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**ऋषिकेश मोरे** बारावी कला शाखेत शिकत असून नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय हँडबॉल निवड चाचणी स्पर्धेतून महाराष्ट्र मध्यप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**ओमराज बाणेगाव पाटील** अकरावी शास्त्र शाखेत शिकत असून सातारा येथे झालेल्या राज्यस्तरीय बेसबॉल निवड चाचणी स्पर्धेतून मुंगेली छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

**ओम वाघमारे** अकरावी शास्त्र शाखेत शिकत असून सातारा येथे झालेल्या राज्यस्तरीय बेसबॉल निवड चाचणी स्पर्धेतून जयपुर राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड. या यशस्वी उदयोन्मुख खेळाडूंचे संस्थेचे सचिव मा. धर्मराज काडादी यांच्यासह जिमखाना चेअरमन प्राध्यापक आनंद चव्हाण, प्रा. एस. एस. वांगी, प्रा. संतोष खेंडे, प्रा.विक्रम विभुते यांच्या सह सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



कांचन चौगुले– सॉफ्ट टेनिस, मानसी जाधव– सॉफ्टबॉल, प्रियांका रावत – टेबल–टेनिस, ओम वाघमारे ओमराज बाणेगाव–पाटील – बेसबॉल, ऋषीकेश मोरे – हँडबॉल, प्रतिक चितारे– क्रिकेट, निहाल गिराम – जलतरण, कल्याणी जाधव – क्रिकेट, ज्योत्स्ना मदने – सॉफ्ट टेनिस.

●●●

# युवा महोत्सवात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसोबत मार्गदर्शक



राष्ट्रीय युवा महोत्सवात पुरस्कार प्राप्त विद्यार्थी कलाकार श्री संगमेश्वर बिराजदार, विश्वेश्वर स्वामी यांचा सत्कार करताना मा.सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली, प्रा.डॉ. राजशेखर येळीकर, प्रा.डॉ. दादासाहेब खांडेकर



हार्दिक अभिनंदन...



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आयोजित युवा महोत्सवात पुरस्कार प्राप्त विद्यार्थी कलाकार आणि मार्गदर्शक प्रा.डॉ. दादासाहेब खांडेकर, महेश क्षीरसागर, प्रा. डॉ. आरती दिवटे.




व्यवस्थापन व संगणक शास्त्र विभाग आयोजित राज्यस्तरीय सॅन उत्सवमध्ये युवकांचा उत्स्फुर्त सहभाग.



## An Autonomous College

We have affiliation system in Higher Education under which the institution has to follow the Parent University in every aspect of it functioning. Developing and designing the syllabus, conducting the examinations and declaring the results is the responsibility of the university. This system of the Britishers has created problem of outdated syllabus, malpractices in examinations, delayed results and late admission process. As a result learners are losing their valuable time for learning. Everyone blaming the universities for the above reasons is indirectly demanding freedom from the affiliation of the parent university.

Autonomy is a heart of education system so the institution should be free to run a syllabus useful to both local and global demands. The learner should be free to choose the subject as per his/her passion. The teachers should be free to disrupt and practice their own teaching methodologies and evaluation techniques. This freedom to any academic institution is called Autonomy. There are different types of autonomy like academic, financial and mixed.

Under the academic autonomy the institutions are free to frame the need based, skill based courses, curriculum, follow learner centric learning methods and innovative evaluation techniques. It is exactly different from the present rote learning in which the students are learning university prescribed syllabus. Mostly the teachers follow routine lecture methods. The students are tested with routine memory testing examinations. The students have readymade material available in the market. As a result they do not find it important to learn regularly and take the success for one shot examination at the end of the term. Consequently the learners are the losers and ultimately the Nation is a loser.

Academic autonomy has all the solutions to the present problems faced by Indian Higher Education. The institutions committed to quality education and Nation building are fast trying to embrace autonomy. However, it is not everybody's cup of tea. It needs necessary NAAC Grade. Sangameshwar is on its way to be the first college in the city to embrace it. It has a strongly willing visionary leadership, aspiring learners, all essential infrastructure facilities, qualified and creative staff to fulfill the demands of an autonomous college. Sangameshwar educating the society from the Kg to PG and leader in Higher Education in Solapur University has remained a role model and is ready to lead from the front. The decision is going to redefine education in Solapur to make the learner with skills to lead a successful and meaningful life.

Dhanappa M Metri, HoD English and Vice Principal






# Why CBSE ...

'Education is the biggest weapon that can change the world,' said Nelson Mandela. The question now is which board offers you the most powerful weapon ? It has been a topic of debate for long. The attempt is not to claim that one is superior than the other. On the other hand, the article just tries to weigh the pros and cons of both state and CBSE board.

Right to get education is the fundamental right of every individual. Both state govts. and central govt. have been making a lot reforms in the field of education to cater to the needs of all. They are trying to make it child centric and child friendly. A good board can make a lot of difference in a child's early development and level of exposure that they would get. The question is how far they are able to do it remains to be seen.

Apart from central and state boards , there are other boards like ISCE, IGCSE that aim at creating 21st century learners with necessary skills. Among all, CBSE stands out as nationalised board that lays emphasis on conceptual clarity and application. It is approved by the Govt. of India and affiliated to a large number of schools including central schools. (Kendriya Vidyalaya ) CBSE syllabus is apt for those who wish to pursue a more challenging and nationally- relevant curriculum. The syllabus is very structured, highly predictable and controlled. Top national level entrance examinations like JEE, NEET, AIEEE, AIPMT are based on CBSE curriculum , and therefore many CBSE students tend to perform better in these.

To analyse further, state board syllabus is merely an introduction of the topic, no background history, no further application of the topics learnt whereas CBSE curriculum encompasses deeper understanding and application of the topics learnt in day to day life. We shall quickly take a look at the major differences of these two boards.

**CBSE syllabus :** In CBSE, main focus is given to science, Maths and application based subjects.

• Mode of instruction followed in CBSE schools is English and Hindi. • All central government schools have to follow guidelines of CBSE. • It gives importance to Scientific methods in subjects. • CBSE often reviews and updates syllabus. • NCERT sets the curriculum for CBSE. • CBSE follows concentric approach as the topics are introduced at an early stage.

**State board syllabus**

• State Board gives preference to the regional language, culture, state level topics and concepts of local relevance. • Mode of instruction followed in state board is English and regional languages. • It is the state Education board that sets the curriculum . • Concentric approach is not seen as syllabus is generally content based.

We can conclude that it is the parents who have to decide which curriculum is suitable for their kids. All the boards impart knowledge. But it is served in different platters. Ultimately they have to decide it on the basis of their child's aptitude and select the board . ●●●

# संगणक शास्त्रातील बदलांचा अध्यापकांनी विद्यार्थी विकासासाठी प्रभावी वापर करावा - प्रा. पुष्पदीप मिश्रा

## संगमेश्वर कॉलेजमध्ये आयआयटी मुंबई आणि पुण्याच्या प्राध्यापकांची एकदिवसीय कार्यशाळा

सोलापूर संगणक शास्त्रातील बदलांचा अध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रभावी वापर करावा असे प्रतिपादन आयआयटी पवईचे प्राध्यापक पुष्पदीप मिश्रा यांनी केले ते संगमेश्वर कॉलेज व्यवस्थापन आणि संगणक शास्त्र विभागाच्या वतीने आय आय टी मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या एकदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळेत बोलत होते.एकदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळा संगणक शास्त्र विभागात आयोजित केली होती, या कार्यशाळेची मूळ संकल्पना व्हर्च्युअल लॅब होती. या कार्यशाळेस सोलापूर, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यातील संगणक शास्त्र आणि अभियांत्रिकी

विभागातील प्राध्यापकांनी आपली उल्लेखनीय उपस्थिती नोंदवली. याप्रसंगी उद्घाटक म्हणून संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस. एम. तोडकरी, व्यवस्थापन समितीच्या सदस्य प्रा. ज्योति काडादी, डॉ. आर. व्ही. देसाई , प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य आदी मान्यवर उपस्थित होते .

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. त्यानंतर प्राध्यापक पुष्पदीप मिश्रा, प्रा. तनुजा खटावकर, प्रा. मनीष नागोसे ,प्राध्यापिका अपसंगी या पी.व्ही. जी. कॉलेज पुण्याच्या प्राध्यापक यांचा सत्कार करण्यात आला. प्राध्यापक मिश्रा पुढे म्हणाले की 'बदलत्या काळानुसार अभियंत्रिकी आणि संगणक क्षेत्रात अमुलाग्र बदलासह नवोपक्रम येत आहेत, त्यांचा स्वीकार करत अध्यापकांनी विद्यार्थीकेंद्री अध्यापन करावे त्यातून सर्वांगीण प्रगती विद्यार्थ्यांची होईल.

संस्थेच्या वतीने धर्मराज काडादी यांनी आपल्या मनोगतात ' कालसुसंगत तंत्रज्ञानाचा वापर करत संगणक क्षेत्रातील ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. संस्थेच्या वतीने आय आय टी मुंबई आणि मानव संसाधन विकास मंत्रालय , भारत सरकारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेचा लाभ प्राध्यापकांनी विद्यार्थी घडवण्यासाठी घ्यावा. अश्या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था प्रयत्नशील आहे .असे सांगितले.

आयटी मुंबई आणि पीव्हीजी कॉलेज पुण्याच्या प्राध्यापकांनी उपस्थित प्राध्यापकांना आपल्या वेगवेगळ्या सत्राच्या माध्यमातून शंकांचे निरसन करत मार्गदर्शन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता उपलप यांनी केले तर आभार प्राध्यापक नागरत्न पेद्दा यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्राध्यापक एन. बी. कोडम प्रा.अर्जुन चौधरी, प्रा. डॉ. एस. एम. निंबाळे आदींनी परिश्रम घेतले. ●●●






## आपल्या अनोख्या शैलीत प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी पटवून दिले विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व




वाचनातूनच आपल्या जिभेवर सरस्वतीचा आणि हातात लक्ष्मीचा वास होतो, शब्दांची महती ज्याला कळली तो जिंकला व ज्याला वाचनाचे महत्व उमजले नाही तो संपला, असे प्रतिपादन प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी संगमेश्वर महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित व्याख्यान मालेत केले. 'वाचाल तर वाचाल' या विषयावर बोलताना ते म्हणाले की, भाषा कुठलीही असो व व्यवसाय कुठलाही असो वाचनाशिवाय पर्याय नाही. अनेक संतांनी, लेखकांनी शब्दांची महती तर सांगितलीच आहे पण त्याचबरोबर शब्दांनी जीवन समृद्ध होते, प्रगल्भता येते संताच्या जीवनचरीत्रातून मानवी जीवनाला दृष्टी मिळते. जीवन कसे जगावे हे संतांनी आपल्या कर्मातून सामान्यांना सांगितले. सामान्य गोष्टच असामान्य लोक विशिष्ट विचारधारेने नियोजनबदध कठोर परिश्रमाने करतात त्यातून त्यांना घवघवीत यश मिळते. अशी अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला आहेत. कुष्ठरोग्यांचे अश्रू पुसणारे बाबाआमटे, तुरुंगातील कैद्यांना माणूस बनवणाऱ्या किरण बेदी, साहित्यातून मानवी मनाला उभारी देणारे अनेक साहित्यिक जीवनाचा आशावाद सांगतात. हे सगळं ग्रंथ वाचनातून आपल्या समोर उभं राहतं म्हणून विद्यार्थी जीवनात पुस्तकांशिवाय पर्याय नाही. डॉ. कलाम यांच्या स्वप्नातील भारतासाठी विद्यार्थ्यांनी आपलं मस्तक सुधारण्यासाठी पुस्तक वाचले पाहिजे. ●●●



## बौद्धिक क्षमतेचा वापर ज्ञानवृद्धी साठी करावा.- डॉ. विजय जोशी

संगमेश्वरमध्ये एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र सोलापूर - जगामध्ये ज्ञानाच्या क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. त्या बदलांना सामोरे जाणे आवश्यक आहे शिक्षकांनी सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमता ओळखून त्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी प्रयत्न करावेत यातून देशाचा बौद्धिक विकास होईल असे विचार महाराष्ट्र राज्य रुसाचे संचालक डॉ. विजय जोशी यांनी मांडले. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित संगमेश्वर महाविद्यालयाच्या वतीने नॅक आयक्यूएसीच्या वतीने आयोजित 'बौद्धिक संपदा अधिकार- ज्ञान भांडवल' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात डॉक्टर जोशी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव धर्मराज काडादी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे विशेष कार्यासन अधिकारी डॉक्टर विकास पाटील उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य मान्यवरांचे स्वागत केलं. डॉ. वंदना पुरोहित येथे यांनी प्रास्ताविक करत राष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. डॉ. उषा जमादार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला . संगमेश्वर महाविद्यालयाच्या उज्वल शैक्षणिक परंपरेचा अभिमान व्यक्त करत डॉक्टर जोशी पुढे म्हणाले, की " भारतीय शिक्षणपद्धतीत बदल व्हायला हवा विद्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमतेची जाणीव शिक्षकांनी ओळखून ज्ञानदान करावे व आपल्या क्षमतांचा वापर करून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधावा आणि त्यांची ज्ञानवृद्धी करावी. आपल्या अध्यक्षीय भाषणात धर्मराज काडादी यांनी काळात त्यांनी एका नावीन्यपूर्ण विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे याचं समाधान व्यक्त केलं. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा उपक्रम अतिशय फलदायी ठरणार असून विद्यार्थ्यांनी नव्या आव्हानांना सामोरे जायला हवे असे विचार मांडले. चर्चासत्रात या पहिल्या सत्रात रुडीमेंट्स ऑफ आयपीआर इंडस्ट्री अँड अकॅडमीक रिसरचेस या विषयावर पुण्याचे डॉक्टर गणेश हिंगमिरे तर दुसऱ्या सत्रात पिलर्स ऑफ आयपीआर कॉपीराईट पेटेंट , डिझाईन, ट्रेडमार्क अँड जॉग्राफिकल इंडीकेशन या विषयावर मुंबईच्या डॉक्टर गोपी कुमार नायर यांनी तर तिसर्या सत्रात डॉक्टर परेश चिंचोळे यांनी पेटंट रायटिंग, पेटंट फायलिंग अँड पेटंट ग्रँट या विषयावर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात सोलापुरातील उद्योजिका चंद्रिका चव्हाण, अनिता शेळके, कृषी तज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे , सुलोचना भाकरे, लक्ष्मी बिराजदार यांनी उपस्थित राहून लाभ घेतला. या चर्चासत्रात ९० हुन अधिक प्राध्यापकानी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन डॉक्टर आरती दिवटे यांनी केलं तर आभार नॅक समन्वय डॉ. आर. व्ही. देसाई यांनी आभार मानले .

## संगमेश्वर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने भुईकोटकिल्ला बागेची स्वच्छता

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती संगमेश्वर कॉलेज च्या विविध विभागाच्या वतीने सोलापुरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या बागेत सर्व विभागाच्या प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत साजरी झाली. सत्य, अहिंसेसोबत आयुष्यभर स्वच्छतेचा पुरस्कार करणाऱ्या बापूजींच्या जन्मदिनी स्वच्छता अभियान कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या चमूसह, प्राध्यापक, कर्मचारी सेवक वृंद यांच्या साथीने राबवण्यात आले. प्रारंभी बापूजींच्या आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली यांच्यासह ज्येष्ठ प्राध्यापक मंडळीनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर प्रा.शिवराज पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाचा हेतू स्पष्ट केला. प्राध्यापिका सोनाली गिरी यांनी आपल्या मनोगतात महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाबद्दल सविस्तर माहिती विशद करत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला. गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन सोलापुरातील लेखिका शांता बुद्धिसागर यांच्यासह विविध स्वातंत्र्यसेनानी यांनी आपले योगदान कसे दिले . हे स्पष्ट करत ऐतिहासिक संदर्भ मोठ्या रंजकतेने सांगितले. या उद्घाटनपर कार्यक्रमात आभार प्रदर्शन प्रा. हर्षवर्धन पाटील यांनी केले .त्यानंतर या स्वच्छता अभियानामध्ये संपूर्ण किल्ला परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणातील कचरा एकत्रित करण्यात संकुलातील प्राध्यापक, कर्मचारी, सेवक वर्ग उत्फुर्तपणे सहभाग झाला होता.






**क्रीडापटूंनी खेळाबरोबरच स्पर्धा परीक्षांकडे लक्ष द्यावं असे प्रतिपादन माजी कर्नल एस. बी. डोळळी यांनी केले.** ते संगमेश्वर कॉलेजच्या ६६ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थी जीवनामध्ये खेळाला महत्त्वाचे स्थान असते. त्यामधून शारीरिक मानसिक विकास घडून येतो. क्रिडांगणावर खेळत असताना विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. विशेषतः आजच्या काळात स्पर्धा परीक्षा ही गोष्ट नोकरी मिळण्याचे प्रमुख साधन बनले आहे. याचा खेळाडूंनी विचार करावा. क्रीडापटूंनी खेळाबरोबरच स्पर्धा परीक्षेकडे ही लक्ष द्यावे असे विचार कर्नल एस. बी. डोळळी यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या जीवनातील अनुभव सांगितले. सोलापूर मध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी बास्केटबॉल खेळाडू म्हणून नावलौकिक मिळवला. त्यानंतर बाहेर जाऊन आपल्या करिअरला सुरुवात केली. बँकेमध्ये नोकरी करून ते यूपीएससी परीक्षा पास झाले. नंतर त्यांनी भारतीय लष्करी सेवेत परीक्षा दिली. या क्षेत्रातील अनुभव सांगताना त्यांनी खेळाडूंना व्यापक दृष्टिकोन घेऊन करिअरच्या क्षेत्रात यश संपादन करण्याचा सल्ला दिला. संगमेश्वर कॉलेज हे क्रीडा क्षेत्रात लौकिक मिळवणारे एक अग्रगण्य कॉलेज असल्याचं त्यांनी नमूद केलं आणि या संधीचा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा आणि आपलं जीवन समृद्ध करावं असंही सांगितलं. प्रयत्न करत राहा यश तुमचेच आहे.

●●●

**विद्यार्थ्यांनी गुणांपेक्षा गुणवत्तेवर भर द्यावा असे प्रतिपादन सोलापूरचे पोलिस आयुक्त महादेव तांबडे यांनी केले ते संगमेश्वर कॉलेज च्या ६६ शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते.** आजची शिक्षण व्यवस्था केवळ गुणांवर केंद्रित झालेली आहे. जेवढे जास्त गुण तेवढी अधिक बुद्धिमत्ता हा समज समाजातील प्रत्येकाने मध्ये निर्माण झाला आहे. मात्र या गुणांच्या बेरजेमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळत असल्याचे त्यांनी सांगितले. याकडे सर्वांचेच दुर्लक्ष होते. केवळ गुण म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांची वाढ होणे हीसुद्धा गुणवत्ताच आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी केवळ गुणांकडे लक्ष न देता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यासह विविध शैक्षणिक, सहशालेय उपक्रमात सहभाग घेऊन आपलं व्यक्तिमत्त्व घडवावे. संगमेश्वर कॉलेजच्या उज्वल परंपरेचा आपण फायदा घेतला पाहिजे. देशाचे नेतृत्व करणारी माणसं या महाविद्यालयातून घडली आहेत. ही गोष्ट आपल्याला अभिमानास्पद आहे. आपल्या शैक्षणिक जीवनाचा प्रवास मांडताना ग्रामीण भागातून संघर्ष करत शिक्षण घेतल्याचे अनुभव त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील एनसीसीमध्ये प्रवेश घेतल्याचा फायदा पुढे स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होताना झाला. एमएससी. अग्री केल्यानंतर कृषी सहाय्यक म्हणून काम करताना आलेले कटू अनुभवही त्यांनी मांडले.अपयश ही यशाची पहिली पायरी असते, जीवनातल्या अनुभवांची डायरी असते असेही त्यांनी सांगितले. या अनुभवातून बाहेर पडून पोलीस आयुक्त पदापर्यंतची आपली यशस्वी वाटचाल त्यांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षा, राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना अशा उपक्रमात नक्की भाग घ्यावा त्यातून आपला सर्वांगीण विकास होतो. कठोर मेहनतीस पर्याय नाही इथे शिकणारी मुले ही शेतकऱ्यांची आहेत त्यांनी बुजरेपणा सोडून शिक्षणातील आव्हाने स्विकारावीत असाही सल्ला त्यांनी दिला.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी कर्नल एस.बी. डोळ्ळी, पोलीस आयुक्त महादेव तांबडे मार्गदर्शन करताना.**

●●●









# STATE LEVEL EVENTS












# ON FIELD ACTIVITIES





# Sangameshwar Public School

## ACHIEVEMENT 2019



II Prize winner in essay writing competition on the topic “Dr APJ Kalam - My Inspiration” held in The Hindu newspaper.
Ms.SupriyaPujari (Grade :- VII)



Mst Affan Nadaf
winner in
swimming competition

- **Proud Prize Winners in Abacus**

1. SamruddhiWaghmode (Grade :- I Tulip)
2. SohamVandhrav (Grade :- II Venus)
3. PremGhodke (Grade :- II Venus)]
4. AvirajGoniyal (Grade :- II Mercury)
5. Nikhil Reddy (Grade :- IV)






- **National Science Olympiad**

1. SwaraliBansode (Bronze) (Grade :- I Rose)
2. ShravyaHarsure (Silver) (Grade :- I Jasmine)
3. MrunmayeeMustud (Gold) (Grade :- I Tulip)
4. Tanishka Babar (Gold) (Grade :- II Earth)
5. AtharvWable (Silver) (Grade :- II Earth)
6. AyushRathod (Bronze) (Grade :- II Venus)
7. ShwetaGaudanavaru (Gold) (Grade :- III Daisy)
8. AdityaMedidar (Gold) (Grade :- IV)



- **International English Olympiad**

SwaraliBansode (Gold) (Grade :- I Rose), NavyaBogam (Gold) (Grade :- I Lotus), PruthvirajDhabade (Gold) (Grade :- I Lotus), PushkrajHukkeri (Silver) (Grade :- I Tulip), KritikaManthalkar (Bronze) (Grade :- I Tulip), AlekhyaSiddral (Gold) (Grade :- II Mars), AdityaKhandelwal (Silver) (Grade :- II Venus), PremGhodke (Bronze) (Grade :- II Venus), SakshiPasare (Gold) (Grade :- III Daisy), ShrivardhanBura (Gold) (Grade :- IV), SaieeShinde (Gold) (Grade :- VI)

# *We Nurture Excellence !*



# संगमेश्वर
## पब्लिक स्कूल
### सोलापूर

**(भाषिक अल्पसंख्यांक संस्था)**

**सी.बी.एस.ई. पॅटर्न**

**संगमेश्वर शिक्षण संस्थेचे स्कूल**
**एज्युकेशन मध्ये पुढचे पाऊल**









**शैक्षणिक क्षेत्रातील मानदंड म्हणजेच संगमेश्वर**
**केजी पासून पीजी पर्यंत शिक्षण देणारं एकमेव दालन**

सोलापूरातील संगमेश्वर ब्रँड म्हणजे गुणवत्ता आणि खेळ यांची अतूलनीय घडण. ६० वर्षांहून अधिक काळ तरुणाईच्या आयुष्याला दिशा देणारं एक शैक्षणिक वळण. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये स्कूल एज्युकेशन मध्ये टाकलेलं पहिलं पाऊल अधिक भक्कम झालं ते आपणां सर्व सोलापूरकरांच्या विश्वासामुळेच.

**नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या वर्गात संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशासाठी आजच संपर्क साधा.**

### वैशिष्ट्ये

- चिमुकल्यांसाठी शास्त्रीय खेळणी
- आकर्षक बैठक व्यवस्था व सुसज्ज ग्रंथालय
- संगमेश्वर कॉलेज परिसरात पाचमजली देखणी इमारत.
- स्पोर्टस् क्लब मार्फत सर्व खेळाच्या सुविधा.
- विद्यार्थ्यांच्या सूप्त गुणांना वाव देण्यासाठी आर्टस् सर्कल
- वाचन अभिरुची जोपासण्यासाठी अनेक अभिनव उपक्रम,
- कल्पक व व्यासंगी शिक्षणवर्ग, शिक्षणाचे नाविन्यपूर्ण प्रयोग.
- मॅथ्स लॅब, संवादकौशल्य वृध्दींगत करण्यासाठी इंग्लिश लॅग्वेज लॅब
- विद्यार्थ्यांकरीता वाहतूक सुविधा

**अधिक माहितीसाठी व प्रवेशासाठी संपर्क :**

**प्राचार्य सौ. गायत्री कुलकर्णी**
**उपप्राचार्य श्री. वादिराज कुलकर्णी**
**पर्यवेक्षक : किर्ती शंकू**

संगमेश्वर पब्लिक स्कूल, सात रस्ता, सोलापूर
फोन : 0217-2313388, 2310088
भ्रमणध्वनी : 09422349425, 9422349459, 9326790305
e-mail - sanpublicschool@yahoo.com
ऑफिस वेळ - स. 9 ते दु. 2 Website : www.sanps.in

Virakshi